दै. पुण्यनगरी

14 JUL 2017

# ज्यावर संसार, ते काम प्रामाणिकपणे करा

## मुंढेंचा कर्मचाऱ्यांना सल्ला : पीएमपीएमएलसमोर प्रतिकिमी ३६ रुपये उत्पन्न वाढीचे आव्हान

**पुणे : प्रतिनिधी**



पीएमपीला सक्षम करण्याच्या कामात वाहक आणि चालक यांची भूमिका महत्त्वाची आहे. बस वाढवून सध्या तरी काही साध्य होणार नाही. त्यामुळे आहे त्याच यंत्रणेवर पूर्ण जोर लावून काम करण्यावर भर असल्याचे संकेत मुढे यांनी दिले. तसेच ज्यावर आपला संसार चालतो, ते काम प्रामाणिकपणे करा, असा सल्ला पीएमपीचे अध्यक्ष तुकाराम मुंढे यांनी कर्मचाऱ्यांना दिला.

सध्या पुणे महानगर परिवहन महामंडळाचे दराडोई उत्पन्न हे साधारण एक कोटी ७० लाख रुपये आहे. तर प्रतिकिमी ५२ रुपये उत्पन्न मिळते. मात्र, यातील २२ रुपये डिझेल, १२ रुपये चालक, १२ रुपये वाहक पगार असा ४६ रुपये खर्च होतो. त्यानंतर प्रशासकीय, देखभाल दुरुस्ती व इतर खर्च जोडला तर हा आकडा ८८ रुपयांवर जातो. त्यामुळे खर्च आणि उत्पन्नाचा मेळ घालण्यासाठी प्रतिकिमी ३६ रुपये उत्पन्न वाढविण्याचे आव्हान पीएमपी समोर असल्याचे मुंढे यांनी स्पष्ट केले.

मुंढे यांची नियुक्ती झाल्यानंतर पीएमपीच्या उत्पन्नात वाढ झाली आहे. मात्र, अजूनही अपेक्षित उत्पन्न मिळत नसल्याने अनावश्यक खर्च कमी करण्यासाठी, तसेच प्रवाशी संख्या वाढविण्यासाठी प्रशासन सरसावले आहे. त्याचाच भाग म्हणून आयटीएमएस आणि आयएफसीएस सारख्या यंत्रणा सुरू करण्यात आल्या आहेत. यासर्वांची माहिती गुरुवारी मुंढे यांनी दिली. केवळ बस पुरवणे हा उद्देश नसून, सार्वजनिक वाहतुकीच्या माध्यमातून विकास कसा होईल यासाठी आम्ही प्रयत्न करतो, असे मुंढे यांनी या वेळी सांगितले.

या शब्दांत मुंढे कर्मचाऱ्यांना प्रोत्साहित करत आहेत. आयटीएमएस प्रणालीमुळे चालक, वाहक काय दिवे लावत आहेत, हे आम्हाला क्षणाक्षणाला कळत आहे. त्यामुळे कार्यक्षम राहा, अशी सूचनादेखील कर्मचाऱ्यांना करण्यात येत आहे.

### वस्तुस्थितीची जाणीव

नवीन यंत्रणेची ओळख करून देताना कर्मचाऱ्यांना पीएमपीच्या आर्थिक परिस्थितीची माहिती दिली जात आहे. मंडळाचे प्रतिकिमी उत्पन्न आणि खर्च किती आहे. त्यात पीएमपीला सध्या परिस्थितीमध्ये प्रतिकिमी ३६ रुपये उत्पन्न वाढविण्याची गरज असल्याचे हिशेब करून पटवून दिले जाते. त्यानंतर, आपल्याला पगार हवा असले तर, जास्तीत जास्त काम करावे लागेल. उपलब्ध गाड्यांमध्ये जास्तीत जास्त प्रवासी कसे प्रवास करतील याकडे लक्ष द्यावे लागेल. त्यासाठी प्रत्येक वाहक, चालकाने आपले वर्तन सुधारून पीएमपीएलच्या उत्कर्षाकडे लक्ष द्यावे, असे कर्मचाऱ्यांना सांगितले जात आहे.